|| श्री गणेशाय नमः ||

हरि:ॐ

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078



॥ श्रीहरिः ॥ 855

श्रीज्ञानेश्वर महाराजकृत

# हरिपाठ

गीताप्रेस गोरखपुर
GITA PRESS, GORAKHPUR

855

॥ श्रीहरि ॥

## ॥ श्री ज्ञानेश्वर महाराजकृत ॥

# हरिपाठ

त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देवदेव॥

गीताप्रेस, गोरखपुर

॥ श्रीहरिः ॥

# श्री ज्ञानेश्वर महाराज यांचा हरिपाठ

*॥ जय जय राम कृष्ण हरि ॥*

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटेवरी ठेऊनिया ॥ १ ॥ तुळसीहार गळा कासे पितांबर। आवडे निरंतर हेचि ध्यान ॥ २ ॥ मकर कुंडले तळपती श्रवणीं। कंठी कौस्तुभमणी

विराजीत ॥ ३ ॥ तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख। पाहीन श्रीमुख आवडीने ॥ ४ ॥

## १

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या ॥ १ ॥ हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥ असोनि संसारी जिह्वे वेगु करी। वेदशास्त्र

उभारी बाह्या सदा ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे व्यासा—
चिये खुणे। द्वारकेचे राणे पांडवा घरी ॥ ४ ॥

## २

चहू वेदी जाण साहि शास्त्री कारण।
अठराही पुराणे हरिसी गाती ॥ १ ॥ मंथुनी
नवनीता तैसे घे अनंता। वाया व्यर्थ
कथा सांडी मार्ग ॥ २ ॥ एक हरी आत्मा।

जीवशिवसमा। वाया तू दुर्गमा न घाली मन॥ ३ ॥ ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ। भरला घनदाट हरि दिसे॥ ४ ॥

## ३

त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ॥ १ ॥ सगुण निर्गुण गुणाचे अगुण। हरीवीण मन व्यर्थ जाय॥ २ ॥ अव्यक्त

निराकार नाही ज्या आकार। जेथोनी चराचर हरिसी भजे॥ ३ ॥ ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। अनंत जन्मानी पुण्य होय॥ ४॥

## ४

भावेवीण भक्ती भक्तीवीण मुक्ती। बळेवीण शक्ती बोलू नये॥ १ ॥ कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत। उगा राहे निवांत शिणसी वाया॥ २ ॥

सायास करिसी प्रपंच दिननिशी। हरीसी न भजसी कोण्या गुणे ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे हरिजप करणे। तुटेल धरणे प्रपंचाचे ॥ ४ ॥

## ५

योगयाग विधि येणें नोहे सिद्धी। वायाची उपाधी दंभ धर्म ॥ १ ॥ भावेवीण देव नकळे निःसंदेह। गुरुविण अनुभव कैसा कळे ॥ २ ॥

तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त। गुजेंवीण हित कोण सांगे ॥ ३ ॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात। साधूंचे संगती तरणोपाय ॥ ४ ॥

६

साधु बोध झाला तो नुरोनियां ठेला। ठायींच मुराला अनुभव ॥ १ ॥ कापुराची वाती उजळली ज्योती। ठायींच समाप्ती झाली

जैसी ॥ २ ॥ मोक्षरेखे आला भाग्यें विनटला। साधूंचा अंकिला हरिभक्त ॥ ३ ॥ ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं। हरि दिसे जनीं वनीं आत्मतत्वीं ॥ ४ ॥

७

पर्वताप्रमाणें पातक करणें। वज्रलेप होणें अभक्तांसी ॥ १ ॥ नाही ज्यासी भक्ती तो पतित

अभक्त। हरिसी न भजत दैवहत॥ २ ॥ अनंत वाचाळ बरळती बरळ। त्यां कैसा गोपाळ पावे हरि॥ ३ ॥ ज्ञानेदवा प्रमाण आत्मा हा निधान। सर्वां घटीं पूर्ण एक नांदे॥ ४॥

## ८

संतांचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणें पंथे॥ १ ॥ रामकृष्ण वाचा भाव

हा जीवाचा। आत्मा जो शिवाचा राम जप ॥ २ ॥
एक तत्व नाम साधिती साधन। द्वैताचे बंधन
न बाधिजे ॥ ३ ॥ नामामृत गोडी वैष्णवां
लाधली। योगिया साधली जीवनकळा ॥ ४ ॥
सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला। उद्धवा लाधला
कृष्णदाता ॥ ५ ॥ ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ।
सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥ ६ ॥

## १

विष्णूवीण जप व्यर्थ त्याचे ज्ञान। रामकृष्णीं मन नाही ज्याचे ॥ १ ॥ उपजोनि करंटा नेणे अद्वैत वाटा। रामकृष्णीं पैठा कैसेनि होय ॥ २ ॥ द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान। तया कैचे कीर्तन घडे नामीं ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे सगुण हे ध्यान। नामपाठ मौन प्रपंचाचे ॥ ४ ॥

## भजन

रामकृष्ण हरी। जय जय रामकृष्ण हरी॥

## १०

त्रिवेणीसंगमी नाना तीर्थे भ्रमी। चित्त नाही नामीं तरि ते व्यर्थ॥ १ ॥ नामासी विन्मुख तो नर पापीया। हरिवीण धांवया न पवे कोणी॥ २ ॥ पुराण प्रसिद्ध बोलिले वाल्मिक।

नामें तिन्ही लोक उद्धरती ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचे । परंपरा त्यांचे कुळशुद्ध ॥ ४ ॥

## ११

हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयाशी क्षणमात्रें ॥ १ ॥ तृण अग्निमेळें समरस झाले । तैसे नामें केले जपतां हरि ॥ २ ॥ हरि उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूतबाधा

भेणे तेथे ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ। न करवे अर्थ उपनिषदा ॥ ४ ॥

## १२

तीर्थ व्रत नेम भावेविण सिद्धी। वायाचि उपाधि करिसी जना ॥ १ ॥ भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे। करतळीं आवळे जैसा हरी ॥ २ ॥ पारियाचा रवा घेता भूमीवरी। यत्न परोपरी

साधन तैसे ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण। दिधले संपूर्ण माझ्या हातीं ॥ ४ ॥

## १३

समाधी हरीची समसुखेवीण। न साधेल जाण द्वैतबुद्धी ॥ १ ॥ बुद्धीचे वैभव अन्य नाही दुजे। एक्या केशीराजे सकळसिद्धि ॥ २ ॥ ऋद्धि सिद्धी निधी अवघीचउपाधी। जव त्या

परमानंदी मन नाही ।। ३ ।। ज्ञानदेवीं रम्य रमले समाधान। हरिचे चिंतन सर्वकाळ ।। ४ ।।

## १४

नित्य सत्यामित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टि ।। १ ।। रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप । पापाचे कळप पळती पुढें ।। २ ।। हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा

तया मोक्ष ।। ३ ।। ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ।। ४ ।।

## १५

एकनाम हरी द्वैतनाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे ।। १ ।। समबुद्धि घेता समान श्रीहरि । शमदमा वैरी हरी झाला ।। २ ।। सर्वांघटीं राम देहादेही एक । सूर्य प्रकाशक सहस्त्र

रश्मीं ॥ ३ ॥ ज्ञानदेवा चित्ती हरिपाठ नेमा। मागिलीया जन्मा मुक्त झालो ॥ ४ ॥

## १६

हरीबुद्धी जपे तो नर दुर्लभ। वाचेसि सुलभ रामकृष्ण ॥ १ ॥ रामकृष्ण नामी उन्मनी साधिली। तयासी लाधली सकळ सिद्धी ॥ २ ॥ सिद्धी बुद्धी धर्म हरिपाठी आले। प्रपंची

निवाले साधुसंगे ॥ ३ ॥ ज्ञानदेवी नाम रामकृष्ण ठसा। येणे दशदिशा आत्माराम ॥ ४ ॥

## १७

हरिपाठ कीर्ती मुखे जरी गाय। पवित्रचि होय देह त्याचा ॥ १ ॥ तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमूप। चिरंजीव कल्प वैकुंठी नांदे ॥ २ ॥ मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार। चतुर्भुज नर होऊन

ठेले ॥ ३ ॥ ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधले। निवृत्तीने दिधले माझे हाती ॥ ४ ॥

## १८

हरिवंश पुराण हरिनाम संकीर्तन। हरिवीण सौजन्य नेणे कांही ॥ १ ॥ तया नरा लाधले वैकुंठ जोडले। सकळही घडले तीर्थाटन ॥ २ ॥ मनोमार्गे गेला तो येथे मुकला। हरिपाठी

स्थिरावला तोची धन्य ॥ ३ ॥ ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी। रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥ ४ ॥

## भजन

जय विठ्ठल जय जय विठ्ठल ॥

## १९

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत

कोटी गेली त्यांचीं ॥ १ ॥ अनंत जन्मांचे तप एक नाम। सर्वमार्ग सुगम हरिपाठ ॥ २ ॥ योगयाग क्रिया धर्माधर्म माया। गेले ते विलया हरिपाठी ॥ ३ ॥ ज्ञानदेवी यज्ञयाग क्रिया धर्म। हरिविण नेम नाही दूजा ॥ ४ ॥

## २०

वेदशास्त्र पुमाण श्रुतीचे वचन। एक नारायण

सार जपा ॥ १ ॥ जप तप कर्म हरिवीण धर्म ।
वाऊगाचि श्रम व्यर्थ जाय ॥ २ ॥ हरिपाठी
गेले ते निवांतचि ठेले। भ्रमर गुंतले सुमन
कळिके ॥ ३ ॥ ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र ।
यमे कुळगोत्र वर्जियेले ॥ ४ ॥

## २१

काळवेळ नाम उच्चारिता नाही। दोन्ही

पक्ष पाही उद्धरती ॥ १ ॥ रामकृष्णनाम सर्व
दोषा हरण। जडजीवा तारण हरि एक ॥ २ ॥
हरिनाम सार जिव्हा या नामाची। उपमा त्या
दैवाची कोण वानी ॥ ३ ॥ ज्ञानदेवा सांग झाला
नामपाठ। पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा ॥ ४ ॥

## २२

नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ। लक्ष्मीवल्लभ

तया जवळी ॥ १ ॥ नारायण हरि नारायण हरि। भक्ति मुक्ती चारी घरी त्यांच्या ॥ २ ॥ हरिविण जन्म तो नर्कचि पै जाणा। यमाचा पाहुणा प्राणी होय ॥ ३ ॥ ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड। गगनाहूनि वाड नाम आहे ॥ ४ ॥

## २३

सात पाच तीन दशकांचा मेळा। एकतत्वीं

कळा दावी हरी ॥ १ ॥ तैसे नव्हे नाम सर्व मार्गा वरिष्ठ । येथे कांही कष्ट न लगतीं ॥ २ ॥ अजपा जपणे उलट प्राणाचा । तेथेही मनाचा निर्धारू असे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा जिणे नामेविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥ ४ ॥

## २४

जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वांघटीं

राम भावशुद्ध ॥ १ ॥ न सोडी रे भावो टाकी रे संदेहो। रामकृष्णी टाहो नित्य फोडी ॥ २ ॥ जात वित्त गोत कुळ शीळ मात। भजे का त्वरित भावनायुक्त ॥ ३ ॥ ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी। वैकुंठभुवनी घर केले ॥ ४ ॥

## २५

जाणीव नेणीव भगवंती नाही। हरि उच्चारणी

पाही मोक्ष सदा ॥ १ ॥ नारायण हरी उच्चार नामाचा। तेथे कळिकाळाचा रीघ नाही ॥ २ ॥ तेथील प्रमाण नेणवे वेदांसी। ते जीवजंतूसी केवि कळे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा फळ नारायण पाठ। सर्वत्र वैकुंठ केले असे ॥ ४ ॥

## २६

एकतत्व नाम दृढ धरी मना। हरिसी करुणा

येईल तुझी ।। १ ।। ते नाम सोपे रे रामकृष्ण गोविंद। वाचेसी सद्गद जपे आधीं ।। २ ।। नामापरते तत्व नाही रे अन्यथा। वायां आणिका पंथा जाशी झणी ।। ३ ।। ज्ञानदेव मौन जपमाळ अंतरी। धरोनी श्रीहरि जपे सदा ।। ४ ।।

## २७

सर्व सुख गोडी सर्व शास्त्र निवडी। रिकामा

अर्धघडी राहु नको ॥ १ ॥ लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरीवीण ॥ २ ॥ नाम मंत्र जप कोटी जाईल पाप। कृष्णीनामी संकल्प धरूनि राहे ॥ ३ ॥ निजवृत्ति काढी सर्व माया तोडी। इंद्रिया सवडी लपो नको ॥ ४ ॥ तीर्थ व्रती भाव धरी रे करुणा। शांति दया पाहुणा हरि करी ॥ ५ ॥ ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान। समाधिसंजीवन हरिपाठ ॥ ६ ॥

## २८

नामसंकीर्तन साधन पैं सोपे। जळतील पापे जन्मांतरीची ॥ १ ॥ न लगती सायास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण ॥ २ ॥ ठायीच बैसोनी करा एक चित्त। आवडी अनंत आळवावा ॥ ३ ॥ रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा। मंत्र हा जपावा सर्व काळ ॥ ४ ॥ यावीण असतां आणीक साधन। वाहातसे

आण विठोबाची ॥ ५ ॥ तुका म्हणे सोपे आहे सर्वांहूनी। शाहाणा तो धनी घेतो येथे ॥ ६ ॥

## २९

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी। तेणे मुक्ती चारी साधियेल्या ॥ १ ॥ हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ॥ २ ॥ असोनि संसारी जिव्हे वेगु करी।

वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणे । द्वारकेचे राणे पांडवा घरी ॥ ४ ॥

## गुरुवारचे अभंग

### ३०

सत्य गुरुराये कृपा मज केली । परी नाही घडली सेवा कांही ॥ १ ॥ सापडविले वाटे

जाता गंगास्नाना। मस्तकी तो जाणा ठेविला
कर॥ २ ॥ भोजना मागती तुप पावशेर। पडिला
विसर स्वप्नामाजी॥ ३ ॥ काय कळे उपजला
अंतराय। म्हणोनिया काय त्वरा झाली॥ ४ ॥
राघव चैतन्य केशव चैतन्य। सांगितली खूण
मालिकेची॥ ५ ॥ बाबाजी आपुले सांगितले
नाम। मंत्र दिला रामकृष्ण हरी॥ ६ ॥ माघ

शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार। केला अंगिकार तुका म्हणे ॥ ७ ॥

## ३१

माझिये मनीचा जाणोनिया भाव तो करी उपाव गुरुरावो ॥ १ ॥ आवडिचा मंत्र सांगितला सोपा। जेणे नोहे गुंफा कोठे काही ॥ २ ॥ जाती पुढे एक उतरले पार। हा भवसागर साधुसंत ॥ ३ ॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी

आवडी। उतार सांगडी तापे पेठे॥ ४॥ तुका म्हणे संती दावियेला तारु। कृपेचा सागरु पांडुरंग॥ ५॥

## ३२

घानोलिया भार राहिलो निश्चिंती। निरविले संती विठोबासी॥ १॥ लाऊनिया हात कुरवाळिला भाथा। सांगितली चिंता न करावी॥ २॥ कटी कर समचरण साजिरे।

राहिला भीवरे तिरी उभा ॥ ३ ॥ खुंटले सायास आणीक या जीवा। धरिले केशवा पाय तुझे ॥ ४ ॥ तुजवाटे आता ते करी अनंता। तुका म्हणे संता लाज माझी ॥ ५ ॥

३३

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव। आपणचि देव होय गुरु ॥ १ ॥ पढिये देहभाव पुरवावी वासना। अंती ते आपणापाशी

न्यावे ॥ २ ॥ मागे पुढे उभा राहे सांभाळीत। आलिया आघात निवाराया ॥ ३ ॥ योगक्षेम त्याचा जाणे जड भारी। वाट दावी करी धरोनिया ॥ ४ ॥ तुका म्हणे नाही विश्वास ज्या मनी। पहावे पुराणी विचारुनी ॥ ५ ॥

३४

आदिनाथ उमा बीज प्रगटिले। मच्छिंद्रा

लाधले सहजस्थिति ॥ १ ॥ तेचि प्रेममुद्रा गोरक्षा लाधली । पूर्ण कृपा केली गहिनीनाथा ॥ २ ॥ वैराग्ये तापला सप्रेमे निवाला । ठेवा जो लाधला शांतीसुख ॥ ३ ॥ निर्द्वंद्व निःशंक विचरता मही । सुखानंद हृदयी स्थिरावला ॥ ४ ॥ विरक्तीचे पात्र अन्वयाचे सुख । येउनि सम्यक अनन्यता ॥ ५ ॥ निवृत्ती गहिनी कृपा केली

पूर्ण। कूळ हे पावन कृष्ण नामे॥ ६ ॥

## ३५

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य॥ १ ॥ मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला। गोरक्ष वोळला गहिनी-प्रती॥ २ ॥ गहिनीप्रसादे निवृत्ती दातार। ज्ञानदेवा सार चोजविले॥ ३ ॥

३६

अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आता। चरणी जगन्नाथा चित्त ठेले॥ १॥ माय जगन्नाथ बाप जगन्नाथ। अनाथांचा नाथ जनार्दन॥ २॥ एका जनार्दनी एकपणे उभा। चैतन्याची शोभा शोभतसे॥ ३॥

३७

अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे

भरीन तिन्ही लोक ॥ १ ॥ जाईन गे माये तया पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया ॥ २ ॥ सर्व सुकृताचे फळ मी लाहीन। क्षेम मी देईन पांडुरंगा ॥ ३ ॥ बाप रुखुमादेवीवरु विठ्ठलाची भेटी। आपुले संवसाठी करुनि ठेला ॥ ४ ॥

## भजन

॥ ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम ॥

## ३८

कृपाळू सज्जन तुम्ही संतजन। हेचि कृपादान तुमचे मज॥ १ ॥ आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा। कीव माझी सांगा काकुळती॥ २॥ अनाथ अपराधी पतित आगळा। परि पाया वेगळा नका करू॥ ३ ॥ तुका म्हणे तुम्ही निरविल्या-वरी। मग मज हरि उपेक्षीना॥ ४॥

## ३९

तीन शिरे सहा हात। तया माझा दंडवत॥ १ ॥ काखे झोळी पुढे श्वान। नित्य जान्हवीचे स्नान॥ २ ॥ शंख चक्र गदा हाती। पायी खडावा गर्जती॥ ३ ॥ माथा शोभे जटा-भार। अंगी विभूती सुंदर॥ ४॥ तुका म्हणे दिगंबर। तया माझा नमस्कार॥ ५ ॥

## ४०

हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥ १ ॥ गुण गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी॥ २॥ नलगे मुक्ती आणि संपदा। संत संग देई सदा॥ ३ ॥ तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी॥ ४ ॥

## भजन

## जय विठ्ठल जय जय विठ्ठल ।

### ४१

बोलिली लेकुरे । वेडी वाकुडी उत्तरे ॥ १ ॥
करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥ २ ॥
नाही विचारिला । अधिकार म्या आपुला ॥ ३ ॥
तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पाया पै किंकरा ॥ ४ ॥

# भजन

## ज्ञानदेव तुकाराम।

## ४२

झाले समाधान। तुमचे देखिले चरण॥ १ ॥
आता उठावेसे मना। येत नाही नारायणा॥ २ ॥
सुखाडिकपणे। येथे सापडले केणे॥ ३ ॥
तुका म्हणे भोग। गेला निवारला लाग॥ ४ ॥

## ४३

करूनी आरती । चक्रपाणी ओवाळिती ॥ १ ॥
आजि पुरले नवस । धन्य काळ हा दिवस ॥ २ ॥
पहा पहा हो सकळा । पुण्यवंत तुम्ही बाळा ॥ ३ ॥
तुका वाहे टाळी । उभा सन्निध जवळी ॥ ४ ॥

## ४४

प्रेमे सप्रेमे आरती । गाविंदाते ओवाळिती ॥ १ ॥

धन्य धन्य ते लोचन। नित्य करिती अवलोकन॥ २ ॥ बाळा प्रौढा आणि मुग्धा। ओवाळिती परमानंदा॥ ३ ॥ नामा म्हणे केशवाते। देखुनि राहिलो तटस्थ॥ ४ ॥

## ४५

त्रिगुणात्मक त्रैय मूर्ति दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा। नेती नेती

शब्द नये अनुमाना। सुरवर मुनिजन समाधि नये ध्याना ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय श्री गुरुदत्ता। स्वामीअवधूता। आरती ओवाळिता। हरली भयचिंता ॥ धृ ॥ सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त। अभाग्यासी कैसी कळेल ही मात। पराहीपरतली तेथे कैचा हेत। जन्म मरणाचा पुरलासे अंत ॥ २ ॥ दत्त येवोनिया उभा ठाकला। सद्भावे साष्टांगे

प्रणिपात केल॥ प्रसन्न होवोनि आशिर्वाद दिला। जन्म मरणाचा फेरा वाचविला॥ ३॥ दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हरपले मन झाले उन्मन॥ मी तू पणाची झाली बोळवण। एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान॥ ४॥ जयदेव जयदेव जय श्री गुरुदत्ता। स्वामी अवधूता। आरती ओवाळिता। हरली भयचिंता॥ धृ॥

## ४६

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा। पंडुलिकाचे भेटी परब्रह्म आलेगा। चरणी वाहे भीमा उद्धरी जगा॥ १॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा। रखुमाई वल्लभा। राहीच्या वल्लभा। पावें जिवलगा॥ धृ॥ २॥ तुळशीमाळा गळा कर

ठेवुनि कटी। कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी। देव सुरवर नित्य येती भेटी। गरूड हनूमंत पुढे उभे राहती ॥ ३ ॥ आषाढी कार्तिकी भक्त- जन येती। चंद्रभागेमाजी स्नान जे करिती। दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती। केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥ ४ ॥

४७

आरती ज्ञानराजा। महाकैवल्य तेजा। सेविती

साधुसंत। मनु वेधला माझा ॥ धृ ॥ १ ॥ लोपले ज्ञान जगी। हित नेणती कोणी। अवतार पांडुरंग। नाव ठेविले ज्ञानी ॥ २ ॥ प्रगट गुह्य बोले। विश्व ब्रह्मचि केले। रामा जनार्दनी। चरणी मस्तक ठेविले ॥ ३ ॥

४८

आरती तुकारामा। स्वामी सद्‌गुरुधामा।

सच्चिदानंद मूर्ती। पाय दाखवी आम्हा ।। धृ ।। १ ।। राघवे सागरात पाषाण तारिले। तैसे तुकोबाचे। अभंग रक्षिले ।। २ ।। तुकिता तुलनेसी। ब्रह्म तुकासी आले। म्हणोनि रामेश्वरे। चरणी मस्तक ठेविले ।। ३ ।।

## ४९

घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यांनी

पाहीन रूप तुझे ॥ १ ॥ प्रेमे आलिंगिन आनंदे पूजीन। भावे ओवाळिन म्हणे नामा ॥ २ ॥

## भजन

विठ्ठल रखुमाई, विठोबा रखुमाई।

## ५०

हेचि व्हावी माझी आस। जन्मोजन्मी तुझा दास ॥ १ ॥ पंढरीचा वारकरी। वारी चुको

नेदी हरि॥ २ ॥ संतसंगे सर्व काळ। अखंड प्रेमाचा कल्होळ॥ ३ ॥ चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान॥ ४ ॥

५१

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा। माझिया सकळा हरीच्या दासा॥ १ ॥ कल्पनेची बाधा न हो कवणे काळी। ही संत मंडळी सुखी

असो ॥ २ ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकांसी ॥ ३ ॥ नामा म्हणे तया असावे कल्याण। ज्यामुखी निधान पांडुरंग ॥ ४ ॥

५२

मागणे ते एक तुजप्रती आहे। देशील तरी पाहे पांडुरंगा ॥ १ ॥ या संतासी निरवी हेचि मज देई। आणिक दुजे काही न मागे देवा ॥ २ ॥

तुकाम्हणे आता उदार तू होई। मज ठेवी पायी संताचिया॥ ३ ॥

## भजन

ज्ञानदेव तुकाराम।

## पसायदान

आता विश्वात्मकेदेवे। येणे वाग्यज्ञे तोषावे। तोषोनि मजद्यावे। पसायदान हे॥ १ ॥ जे

खळाची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परे पडो। मैत्र जीवाचे ॥ २ ॥ दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो। जो जे वांछील तो ते लाहो। प्राणिजात ॥ ३ ॥ वर्षत सकळ मंगळी। ईश्वर निष्ठांची मांदियाळी। अनवरत भूमंडळी। भेटो तया भूता ॥ ४ ॥ चला कल्पतरूंचे

आरव। चेतना चिंतामणीचे गाव। बोलती जे अर्णव। पीयूषाचे ॥ ५ ॥ चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥ ६ ॥ किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होऊनि तिही लोकी। भजिजो आदिपुरुखी अखंडित ॥ ७ ॥ आणि ग्रंथोपजीविये। विशेषी लोकीं इये। दृष्टादृष्टविजये। होआवे जी ॥ ८ ॥

येथ म्हणे श्री विश्वेशरावो। हा होईल दान पसावो। येणे वरे ज्ञानदेवो। सुखिया जाहला॥ ९ ॥

## भजन

## ज्ञानदेव तुकाराम

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

YouTube hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com